# प्रेसनोट

---

## ४८ तासात जबरी चोरी करणा-यास अटक करुन जबरी चोरी केलेला माल हस्तगत करण्यात आला आहे.

---

खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर २०५/२०१७ भा.द.वि.कलम ३९२ मधील फिर्यादी नामे प्रयागबाई मारुती लोखंडे वय – ७० वर्षे रा. ७८ ईपी कासेवाडी भवानीपेठ पुणे यांचा आंबे विक्रीचा व्यवसाय असुन दिनांक १३/०५/२०१७ रोजी रात्रौ ०९/३० वा. चे. सुमारास फिर्यादी हया आंबे विक्री करुन टिंबर मर्चन्ट कॉलनी भवानीपेठ पुणे येथुन घरी जात असताना त्यांचे घराजवळ राहणारा आकाश अनिल पवार हा समोरुन येवुन फिर्यादीस बोलण्यात गुंग करुन फिर्यादी यांची कि. रु. ५४,४००/- रु. असलेली पिशवी ही हिसका मारुन जबरदस्तीने काडुन घेवुन पळुन गेला सदर बाबत खडक पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीचा खडक पोलीस ठाणे तपासपथक हे शोध घेत असताना तपास पथकाकडील पोलीस कर्मचारी रविंद्र लोखंडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, यातील आरोपी आकाश अनिल पवार हा दत्त मंदिर चौक बुधवार पेठ पुणे येथे येणार आहे. त्या मिळालेल्या बातमी वरुन यातील आरोपी नामे आकाश ऊर्फ चांग्या अनिल पवार वय – २० वर्षे रा. कासेवाडी भवानी पेठ पुणे यास जेर बंद करुन त्याचे कडुन जबरी चोरी करुन नेलेले ५४,४००/- रु. पैकी ७५००/- रु. जप्त करण्यात आहे. सदरचा आरोपी हा खडक पोलीस ठाणे रेकॉर्डवर असुन त्याची पोलीस कोठडी घेवुन अधिक तपास करण्यात आला असुन मा. न्यायालयाने त्याची येरवडा कारागृह येथे रवानगी केली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त मा. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त बाजीराव मोहिते, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संभाजी शिर्के तपास पथकाचे पोलीस उपनिरीखक आनंत व्यवहारे, पोलीस कर्मचारी, संतोष मते, महेंद्र पवार, सर्फराज शेख, विनोद जाधव, अनिकेत बाबर, रविंद्र लोखंडे, इमरान नदाफ,हिम्मत होळकर, महेश बारवकर यांनी केलेली आहे.